# प्रेस नोट

## अनधिकृत गॅस सिंलेंडरचा वापर करणाऱ्यांवर कारवाई केलेबाबत...

सध्या आखाती देशात युध्दजन्य परिस्थितीत मुळे गॅस सिलेंडरचा तुटवडा निर्माण झालेला आहे. अशा परिस्थीतीत अनधिकृत गॅस सिंलेंडर वापरण्यावर कारवाई होणे आवश्यक आहे.

सदर बाबत मालाड पोलीस ठाणे हद्दीमध्ये सार्वजनीक ठिकाणी प्रामुख्याने चायनिज फुड, भुर्जी पाव, मसाला डोसा, इत्यादी खद्य पदार्थ अनधीकृतपणे सार्वजनीक ठिकाणी येणाऱ्या जाणाऱ्या लोकांना व पादचाऱ्यांना व वाहतुकीस अडथळा निर्माण करणाऱ्या तसेच सार्वजनीक ठिकाणी लोकांच्या जीवीतास धोका निमार्ण होईल अशा पध्दतीने बेकायदेशीर घरगुती व व्यावसाईक गॅस सिलेंडर वापर करणाऱ्या हॉसर्क वर कारवाई करून एकुण १३ गॅस सिलेंडर जप्त करून भा.न्या.सं. कलम २८७ प्रमाणे एकुण १३ गुन्हे नोंद करण्यात आलेले आहेत. सदर गॅस सिलेंडर जप्त करून भारत गॅस व एच.पी. गॅस यांना सदरचे गॅस सिलेंडर ताब्यात घेण्याकरीता पत्र देण्यात आलेले आहे.

सदरची कारवाई श्री. शशिकुमार मीना, मा. अपर पोलीस आयुक्त, उत्तर प्रादेशिक विभाग, मुंबई, श्री संदीप जाधव, मा.पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-११ मुंबई, श्री.विजय भिसे, मा. सहाय्यक पोलीस आयुक्त, दिंडोशी विभाग, मुंबई, यांचे मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक, श्री. दुष्यंत चव्हाण व स्टाफ यांनी केली आहे.

----------------ooo-----------------

Scanned with CamScanner